# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
**४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.**

२५६५६२३४ **Email : ropune@dtemaharashtra.gov.in**


जा. क्र. : तंशिविकापु/विवि/गुणवत्तायादी २०१९/२०२०/0२3 दिनांक : 06 FEB 2020

प्रति
संचालक / प्राचार्य
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त **अनुदानीत/ विना अनुदानीत**
व्यावसायीक पदवी/ पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था.

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत...
प्रवेश प्रक्रिया शुल्क रकमेचा भरणा करण्याबाबत....

संदर्भ :- १. संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०२०/७३ दिनांक ०५/०२/२०२०
२. मा सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र क्रमांक प्रनिप्रा/प्र.क्र.६६/नोंदणी प्रक्रिया/२०१९/०५७ दिनांक ३१/१/२०२०.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन पत्रे आपल्या माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सोबत जोडलेली आहे.

अनुदानीत आणि विनाअनुदानीत महाविद्यालये /संस्थांनी अधिनियम २०१५ अन्वये लागू करण्यात आलेले प्रक्रिया शुल्काची रक्कम प्राधिकरणाकडे भरणे अनिवार्य आहे. त्याअनुषंगाने उपरोक्त संदर्भिय पत्राव्दारे दिलेल्या सुचनांनुसार आपणास कळविण्यात येते की, **ज्या अनुदानीत आणि विना अनुदानीत महाविद्यालये /संस्थांनी** प्रक्रिया शुल्क अद्याप अदा केलेले नाही, अशा संस्थांनी त्यांच्याकडून देय होणारी रक्कम यापूर्वी दिलेल्या सुचनेनुसार तात्काळ अदा करावी. ज्या संस्था प्रक्रिया शुल्क भरणार नाहीत अशा संस्थेमधील प्रवेशित विद्यार्थ्यांना प्राधिकरणाची मान्यता मिळणार नाही याची आपण नोंद घ्यावी.

प्रक्रिया शुल्काची रक्कम अदा करण्यास ऑनलाईन पोर्टलवर अडचणी येत असल्यास सदर रक्कम Demand Draft व्दारे अदा करण्याची मुभा देण्यात आली असून सदर डिमांड ड्राफ्ट, **Secretary, Admissions Regulating Authority, Mumbai (Payable at Mumbai)** यांचे नावे काढण्यात यावा आणि सोबत जोडलेल्या Annexure - C सोबत प्राधिकरणाकडे पाठविण्यात यावा.

Gaikwad 6-2-2020
प्र. सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

सोबत - संदर्भिय पत्राच्या छायाप्रती व Annexure-C

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक: २अ/एडीएम/२०२०/७३

दिनांक : - 5 FEB 2020

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपुर,

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत प्रवेश प्रक्रिया शुल्क रकमेचा भरणा करण्याबाबत...

संदर्भ : मा.सचिव,प्रवेश नियामक प्राधिकरण,मुंबई यांचे पत्र क्रमांक प्रनिप्रा/ प्र.क्र.६६/नोंदणी प्रक्रिया/२०१९/०५७, दिनांक ३१.१.२०२०

उपरोक्त विषयाबाबत प्रवेश नियामक प्राधिकरणाने संदर्भाधीन पत्रान्वये खालील सूचना निर्गमित केलेल्या आहेत. (सोबत प्रत जोडली आहे)

व्यावसायिक अभ्यासक्रमाशी संबंधित अनुदानीत आणि विनाअनुदानीत महाविद्यालये/ संस्थांनी अधिनियम २०१५ अन्वये त्यांना लागू करण्यात आलेली प्रक्रिया शुल्काची रक्कम प्राधिकरणाकडे भरणे अनिवार्य आहे. सबब, ज्या महाविद्यालये/ संस्थांनी अद्याप प्रक्रिया शुल्काचा भरणा केलेला नाही अशा संस्थांनी त्यांच्याकडून देय होणारी रक्कम यापूर्वी दिलेल्या सूचनेनुसार तात्काळ अदा करावी अन्यथा त्या संस्थेच्या प्रवेशित विद्यार्थ्यांना प्राधिकरणाची मान्यता मिळणार नाही. ही बाब आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांच्या निदर्शनास आणावी.

तसेच प्रक्रिया शुल्काची रक्कम अदा करण्यास ऑनलाईन पोर्टलवर अडचणी येत असल्यास , सदर रक्कम Demand Draft द्वारे अदा करण्याची मुभा देण्यात येत असून सदर Demand Draft Secretary, Admissions Regulating Authority, Mumbai (Payable at Mumbai) यांच्या नावे काढण्यात यावा आणि संदर्भाधीन पत्रासोबतच्या Annexure-C सोबत प्राधिकरणाकडे पाठविण्यात यावा असेही सर्व संस्थांना सूचित करण्यात येत आहे.

(डॉ.अभय वाघ)

संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा.सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य,८वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांना माहितीस्तव सादर

E:\Budage\२०२०-२१\General Correspondence\Processing Fee letter to All RO.docx

महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : प्रनिप्रा/प्र.क्र.६६/नोंदणी प्रक्रिया/२०१९/०५७ दिनांक : 31 JAN 2020

प्रति,
संचालक,
तंत्रशिक्षण/उच्च शिक्षण/वैद्यकीय शिक्षण व संशोधन,
आयुष संचालनालय/कृषी विभाग/कला संचालनालय.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत...
प्रवेश प्रक्रिया शुल्क रक्कमेचा भरणा करण्याबाबत.**
**संदर्भ : प्रनिप्रा/प्र.क्र.६६/प्रवेश मान्यता/२०१९, दि.१८/०१/२०२०.**

महोदय,

शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मधील प्रवेशांना मान्यता देण्यासंदर्भातील प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने व्यावसायिक अभ्यासक्रमाशी संबंधित सर्व शासकीय, अनुदानित आणि विनाअनुदानित महाविद्यालये/संस्थांनी प्राधिकरणास देय असलेले प्रक्रिया शुल्क दि.३१/०१/२०२० पर्यंत अदा करण्याबाबत संदर्भात नमुद केलेल्या दि.१८/०१/२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये निर्देशित करण्यात आलेले आहे. तथापि या संदर्भात प्राधिकरणाने घेतलेल्या फेर निर्णयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येत आहे की, शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग आणि कृषी व पशु संवर्धन विभाग यांच्याकडुन प्राप्त झालेल्या अभिप्रायानुसार, व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या शासकीय महाविद्यालये/संस्थांना सन २०१९-२०२० या वर्षाचे प्रक्रिया शुल्क भरण्यापासून सुट देण्यात येत आहे. तथापि सदर महाविद्यालये/संस्थांकडुन प्राधिकरणाला प्रक्रिया शुल्काची रक्कम न मिळाल्यामुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई म्हणून शासनाने तेवढ्या रक्कमेचे अनुदान प्राधिकरणाला मंजूर करावे अशा प्रकारचा प्रस्ताव सर्व संचालकांनी शासनाला पाठवावा.

त्याचप्रमाणे व्यावसायिक अभ्यासक्रमाशी संबंधित अनुदानित आणि विनाअनुदानित महाविद्यालये/संस्थांनी अधिनियम, २०१५ अन्वये त्यांना लागू करण्यात आलेली प्रक्रिया शुल्काची रक्कम प्राधिकरणाकडे भरणे अनिवार्य आहे. सबब, ज्या महाविद्यालये/संस्थांनी अद्याप प्रक्रिया शुल्काचा भरणा केलेला नाही अशा संस्थांनी त्यांच्याकडुन देय होणारी रक्कम यापूर्वी दिलेल्या सुचनेनुसार तात्काळ अदा करावी अन्यथा त्या संस्थेच्या प्रवेशित विद्यार्थ्यांना प्राधिकरणाची मान्यता मिळणार नाही असे सर्व संबंधित संस्थांना संचालक स्तरावरुन कळविण्यात यावे.

आपणांस असे कळविण्यात येते की, प्रक्रिया शुल्काची रक्कम अदा करण्यास ऑनलाईन पोर्टलवर अडचणी येत असल्यास, सदर रक्कम, Demand Draft द्वारे अदा करण्याची मुभा देण्यात येत असुन सदर Demand Draft Secretary, Admissions Regulating Authority, Mumbai (Payable at Mumbai) यांच्या नावे काढण्यात यावे आणि सोबत जोडलेल्या **Annexure - C** सोबत प्राधिकरणाकडे पाठविण्याबाबत सर्व संबंधित महाविद्यालयांना सूचित करण्यात यावे.

(संदीप कदम)भा.प्र.से.
सचिव,
प्रवेश नियामक प्राधिकरण,
मुंबई.

D:\Priya\Processing fee Extension note.docx

Scanned by CamScanner

ANNEXURE - C

## ADMISSIONS REGULATING AUTHORITY

## PROCESSING FEES STATEMENT

A) Name and Address of College:______________________ Academic Year: 2015-16.

| Course Name with Code No. and Total Sanctioned Intake of First Year | Total No. of Seats under "CAP" Quota | Total No. of Seats under TFWS / schemes | Total No. of Seats for Direct Second Year | Total No. of Seats for any other Scheme / Course | Total No. Seats (Total of Col. 2+3+4+5) | (Col. 6) x Rs. 100/- (Equal to or Not less than Rs. 20,000/-) Amount in Rupees | Total No. of Seats under Institutional / NRI, etc Quota. | (Col. 8) x Rs. 1000/- Amount in Rupees | Amount payable by College as a Processing Fees (Col. 7 + Col. 9) Amount in Rupees. | Demand Draft / Pay order No. of Amount of Col. (10) and date |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) | (11) |

B) Name and Address of College:______________________ Academic Year: 2016-17.

| Course Name with Code No. and Total Sanctioned Intake of First Year | Total No. of Seats under "CAP" Quota | Total No. of Seats under TFWS / schemes | Total No. of Seats for Direct Second Year | Total No. of Seats for any other Scheme / Course | Total No. Seats (Total of Col. 2+3+4+5) | (Col. 6) x Rs. 100/- (Equal to or Not less than Rs. 20,000/-) Amount in Rupees | Total No. of Seats under Institutional / NRI, etc Quota. | (Col. 8) x Rs. 1000/- Amount in Rupees | Amount payable by College as a Processing Fees (Col. 7 + Col. 9) Amount in Rupees. | Demand Draft / Pay order No. of Amount of Col. (10) and date |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) | (11) |

Note : Demand Draft / Pay Order should be in the name of "SECRETARY, ADMISSIONS REGULATING AUTHORITY. MUMBAI", payable at Mumbai.

F:\Jayant\Processing Fees - Statement.docx

Scanned by CamScanner